"A++" Accredited by NAAC (2021)
With CGPA

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
परीपत्रक
५८/२०२२

सर्व शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय अधिकारी, विभाग प्रमुख, सेवक यांना कळविण्यात येते की, मुख्य प्रशासकीय इमारतीच्या समोर तसेच इमारतीच्या उजव्या व डाव्या बाजूला विद्यापीठ वाहनांखेरीज इतर वाहने लावली जात असल्याचे कार्यालयाच्या वारंवार निदर्शनास येत आहे. यास्तव आदेशान्वये कळविण्यात येते की, मुख्य प्रशासकीय इमारतीच्या समोर मा. कुलपती तथा राज्यपाल महोदय, मा. मंत्री महोदय, विद्यापीठाचे मा. कुलगुरु, प्र—कुलगुरु, कुलसचिव, वित्त व लेखा अधिकारी आणि संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांचेकरीताची तसेच विद्यापीठाच्या प्रशासकीय कामाकरीता वापरण्यात येणारी फक्त विद्यापीठाचीच वाहने आवश्यकतेनुसार लावली जातील. सदर वाहनांव्यतिरिक्त मुख्य प्रशाकीय इमारतीच्या समोर तसेच उजव्या व डाव्या बाजूच्या परीसरात इतर कोणत्याही वाहनांना पार्किंग करता येणार नाही. विद्यापीठ कार्यालयातील सर्व शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय अधिकारी, विभाग प्रमुख, सेवक, विद्यार्थी / विद्यार्थीनी व अभ्यागतांनी आपली वाहने ही कार्यालयाने संबंधितांसाठी निश्चित केलेल्या वाहन तळाच्या ठिकाणीच पार्किंग करणे आवश्यक आहे. या व्यतिरिक्त अन्य ठिकाणी वाहनांचे पार्किंग झालेचे कार्यालयाच्या निदर्शनास आल्यास नियमानुसार याबाबत कार्यवाही केली जाईल.

प्र.कुलसचिव

जावक क्रमांक/आस्थापना 2433
दिनांक :— 13 DEC 2022
प्रति,
सर्व संबंधित,
प्रत —

१. मा. कुलगुरु, प्र—कुलगुरु, कुलसचिव, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी, सर्व रेक्टरर्स.
२. सुरक्षा अधिकारी यांना — उपरोक्त प्रमाणे वाहन पार्किंगची व्यवस्था करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

**** अधिविभाग प्रमुख व विभाग प्रमुख यांनी सदर परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षक, अधिकारी, सेवक, विद्यार्थी, विद्यार्थीनी यांच्या निदर्शनास आणावे. ****